## अधिसूचना

उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक १५ मे, २००८.

**महाराष्ट्र विजेच्या विक्रीवरील कर अधिनियम, १९६३**

क्रमांकः टिअेसी २००८/प्र.क्र.४३/ऊर्जा १- महाराष्ट्र विजेच्या विक्रीवरील कर अधिनियम, १९६३ (१९६३ वर महा. २१) च्या कलम ३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या आणि या संदर्भात त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन आणि शासन अधिसूचना क्रमांक इबीटी २००४/प्र.क्र. ४२/ऊर्जा-१, दिनांक १९ मे, २००४ चे अधिक्रमण करुन महाराष्ट्र शासन याद्वारे दिनांक १ मे, २००८ पासून खालील सारिणीच्या स्तंभ (२) येथे नमूद केलेल्या क्षेत्रामध्ये विद्युत उपक्रमाने विकलेल्या विजेच्या प्रत्येक युनिटवर उक्त सारिणीच्या स्तंभ (३) येथे नमूद केलेले कराचे दर विनिर्दिष्ट करीत आहे.

**सारिणी**

| अ.क्र. | क्षेत्र | वीज विक्रीकराचे दर |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | टाटा पॉवर कंपनी, रिलायन्स एनर्जी लिमिटेड, आणि बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम यांना मंजूर केलेल्या वीज वितरण परवान्यातील क्षेत्रामध्ये:- | |
| | (अ) औद्योगिक आणि व्यापारी ग्राहकांना विकलेल्या वीजेच्या संबंधात; | २३ पैसे प्रति युनिट |
| | (ब) औद्योगिक आणि व्यापारी ग्राहकांव्यतिरिक्त अन्य ग्राहकांना विकलेल्या वीजेच्या संबंधात | १५ पैसे प्रति युनिट |
| २ | राज्यातील अन्य क्षेत्रामध्ये - | |
| | (अ) औद्योगिक आणि व्यापारी ग्राहकांना विकलेल्या वीजेच्या संबंधात; | ८ पैसे प्रति युनिट |
| | (ब) औद्योगिक आणि व्यापारी ग्राहकांव्यतिरिक्त अन्य ग्राहकांना विकलेल्या वीजेच्या संबंधात | निरंक |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( गुलाबराव कि.गोरडे)
कक्ष अधिकारी

17 MAY 2008

प्रति,

व्यवस्थापक,शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई नेताजी सुभाष पथ, मुंबई ४००००४.
त्यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द करुन त्यांच्या

(प्र. नी. मुदखेडकर)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१) मुख्य अभियंता (विद्युत), सार्वजनिक बांधकाम विभाग, प्रशासकीय इमारत, ३ रा मजला, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर (पूर्व) मुंबई ४०० ०७१,
२) महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, म्हाडा कमर्शिअल कॉम्प्लेक्स, सर्वे नं.१९१-अे, फेज १, त्रिदलनगर समोर, येरवडा पुणे ४११००६.
३) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
४) महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम, बेस्ट भवन, बेस्ट मार्ग, टपाल पेटी क्र. १९२, मुंबई ४०० ००१.
५) अध्यक्ष, टाटा पॉवर कंपनी लि., बॉम्बे हाऊस, २४, होमी मोदी स्ट्रीट, मुंबई ४०० ००१
६) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, रिलायन्स एनर्जी लि. रिलायन्स एनर्जी सेंटर, सांताक्रुझ (पू), मुंबई ४०० ०५५,
७) मुळा प्रवरा इले को.सोसा. लि. श्रीरामपूर जि. अहमदनगर,
८) महालेखाकार, (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र मुंबई.
९) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)-२ महाराष्ट्र, नागपूर.
१०) महालेखापाल, (लेखा परिक्षा) १ महाराष्ट्र, मुंबई.
११) महालेखापाल, (लेखा परिक्षा)-२ महाराष्ट्र, नागपूर.
१२) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
१३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१४) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१५) निवड नस्ती (ऊर्जा-१)